# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### गोरेगाव (मुंबई) येथील आरेमधील ६०० एकर जमीन वनासाठी राखीव ठेवण्याचा निर्णय होऊनही आजमितीस त्याची अंमलबजावणी न झाल्याबाबत

**(१) १०७१८ (२०-११-२०२१) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव (मुंबई) येथील आरेमधील ६०० एकर जमीन वनासाठी राखीव ठेवण्याचा निर्णय माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान झाल्यानंतर आठशे एकरापेक्षा अधिक जागेवर वनक्षेत्र घोषित करण्याचा निर्णय घेण्यात आला मात्र या घोषणेनंतर प्रत्यक्षात अंमलबजावणी अत्यंत संथ गतीने होत असल्याने सदरहू जमिनीवर अतिक्रमणही होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पहिल्या टप्प्यात घोषणा झाल्यानंतर अंतिम नोटिफिकेशनही आजमितीस काढण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राखीव वनासंदर्भात केवळ घोषणा पुरेशी नाही त्याची कठोरपणे अंमलबजावणी होत नसल्याने आरेप्रेमीकडून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जमिनीचे सर्व्हेक्षण, ड्रोनच्या माध्यमातून सर्व्हेक्षण, आरेमध्ये वन विभागाचे अस्तित्व अशा अनेक बाबी अजूनही प्रलंबित आहेत तसेच पहिल्या टप्प्याच्या घोषणेनंतर दुसऱ्या टप्प्यामध्ये काही बाबी प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, घोषणेनंतर अंमलबजावणी विलंब व टाळाटाळ होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, तसेच वन विभागाच्या ताब्यात आलेल्या संपूर्ण आठशे एकर जागेवर कोणत्याही प्रकारे अतिक्रमण होऊ नये व या जागेचे संरक्षण होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (२३-१२-२०२१) :** (१) व (२) आरे, गोरेगाव येथील जंगलाचे गुणधर्म असलेले ३२७.२०१ हे. क्षेत्र भारतीय वन अधिनियम, १९२७ मधील तरतूदीनुसार दिनांक १२/१०/२०२० रोजीच्या अधिसुचनेन्वये राखीव वन म्हणून घोषित करण्यात आले आहे. मात्र सदर क्षेत्रावर अतिकमण होत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

तसेच अधिसुचीत क्षेत्रावरील अधिकारांचे अस्तित्व, स्वरुप व व्याप्ती निर्धारित करण्याकरीता भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम ४ खंड (क) अन्वये वन जमाबंदी अधिकारी, कोकण यांची नियुक्ती करण्यात आली असून सद्य:स्थितीत सदर प्रक्रीया कार्यान्वित आहे. तदनंतर कलम २० अन्वये अंतिम अधिसुचना निर्गमित करण्यात येईल.
(३) हे खरे नाही.
(४) मौजे मरोळ मरोशी, आरे व गोरेगाव येथील ३२७.२०१ हे. क्षेत्र वन विभागाने ताब्यात घेतले असून मोजणी करुन हद्द निश्चिती करण्यासाठी नगर भुमापन विभागाकडे शासकीय दराने रक्कम भरणा करण्यात आली आहे. सदर क्षेत्रापैकी मरोळ मरोशी व गोरेगाव येथिल क्षेत्राची मोजणी प्रकिया पूर्ण झाली असून आरे येथील क्षेत्राची मोजणी करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) आरे येथील वन विभागाच्या ताब्यातील ३२७.२०१ हे. क्षेत्राच्या संरक्षणार्थ सद्य:स्थितीत १ वनपाल व ४ वनरक्षक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर कर्मचाऱ्यांमार्फत राखीव वनक्षेत्रामध्ये नियमित गस्ती करण्यात येत असून संरक्षणाच्यादृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील मोर्ले ते पारगड किल्ला रस्त्याचे काम बंद असल्याबाबत

**(२) १०७२६ (२०-११-२०२१) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील मोर्ले ते पारगड किल्ला रस्त्याच्या कामाचा शुभारंभ ३ वर्षापूर्वी मोर्ले गावातून करण्यात आला असला तरी सदरहू रस्त्याचे काम मागील २ वर्षांपासून अपूर्णावस्थेत असून त्याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष झाले आहे तसेच सावंतवाडी येथील ठेकेदाराने काम सुरू करून काही किलोमीटर पूर्ण केल्यानंतर काम सोडून ठेकेदार गायब झाला असून तो आजमितीस कामावर आला नाही व चंदगड तालुका (जि.कोल्हापूर) हद्दीतील काम एक वर्षे उशिरा सुरू झाले तरी जवळपास ७० टक्के कोल्हापूर जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाने काम पूर्ण केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ऐतिहासिक पारगड किल्ल्यावर जाणाऱ्या रस्त्याचे काम गत २ वर्षांपासून संपूर्णत: ठप्प झाल्याने त्या परिसरातील ग्रामस्थ तसेच किल्ला प्रेमींकडून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याकडे सार्वजनिक बांधकाम विभाग, दोडामार्ग यांचे दुर्लक्ष झाले असल्याने आधिच नुकसान झालेल्या या रस्त्याकडे लक्ष न दिल्यास पावसाळयात हा संपूर्ण रस्ता खराब होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू रस्त्यांचे काम मागील २ वर्षापासून संपूर्णत: अपूर्णावस्थेत राहण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, तसेच सदरहू रस्त्यांचे अपूर्णावस्थेत बंद असलेले काम विनाविलंब हाती घेऊन पूर्ण करण्याच्यादृष्टीने तसेच या रस्त्याच्या कामास झालेल्या विलंबाबाबत संबंधित अधिकाऱ्यांवर व ठेकेदारांवर कायदेशीर कारवाई करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (१४-१२-२०२१) :** (१) व (२) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मोर्ले ते पारगड किल्ला या रस्त्याची कि.मी. ६/९३५ ते १२/४८० ही लांबी वनक्षेत्रातील असून, वन विभागाची परवानगी प्राप्त झाल्यानंतर काम सुरु करण्यात आले.

सद्य:स्थितीत ६/३०० ते १२/४८० कि.मी या लांबीतील मंजूर वावानुसार मातीकाम पूर्ण झाले आहे. खडीकरण व मोऱ्यांची कामे प्रगतीत आहेत.

कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुक्यातील मोटणवाडी वाघोत्रे तेरवण नामखोल पारगड मिरवेल रस्ता १८७ मधील कि.मी. २०/०० ते २४/०० मध्ये ३ कि.मी. लांबीतील मातीकाम पूर्ण झालेले आहे.

(३) हे खरे नाही.

सदर लांबीतील मातीकाम, खडीकरण व मोऱ्यांची कामे पूर्ण झाल्यानंतर मजबुतीकरण व डांबरीकरणाचे मंजूर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

(४) सदर रस्ता वनक्षेत्रात येत असल्यामुळे आवश्यक त्या परवानग्या प्राप्त करण्यास लागलेला कालावधी, कोरोना विषाणू रोगाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे कामावरील निर्बंध तसेच अवकाळी पाऊस या कारणास्तव कामास विलंब झाला आहे. तथापि, सदरची कामे प्राधान्याने पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात २२ वाघांचे मृत्यू झाल्याबाबत

**(३) १०७७७ (२०-११-२०२१) श्री.अनिकेत तटकरे, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.मोहनराव कदम, श्री.शशिकांत शिंदे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड, श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशात "क्ला" (कन्झर्वेशन लेन्सेस ॲण्ड वाईल्डलाइफ) ही संस्था मागील अनेक वर्षांपासून वन्यजीव क्षेत्रात कार्यरत असून या संस्थेकडून वाघांच्या मृत्यूसंदर्भात माहिती संकलित करुन ती वेळोवेळी प्रसिध्द केली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्थेने देशपातळीवरील वाघांच्या मृत्यू संदर्भात प्रसिध्द केलेल्या आकडेवारीनुसार वन कर्मचाऱ्यांच्या कोरोना काळात व्याघ्र संरक्षणावर झालेल्या दुर्लक्ष/परिणामामुळे गत सहा महिन्यात राज्यात २२ वाघांचे मृत्यू झाले असल्याचे दिनांक १२ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात व्याघ्र संरक्षणासाठी अनेक परिणामकारक उपाय राबविले जात असल्याचा दावा वन विभागाने केला असला तरी मागील ६ महिन्यात राज्यात २५ वाघांचा मृत्यू शिकारी, विजेचा धक्का लागल्याने, विषबाधा, अपघात, हद्दीचा वाद यामुळे झाल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२१ वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर वाघांचे मृत्यू नेमके कोणत्या कारणांमुळे झाले याबाबत शासनस्तरावर चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार व्याघ्र संरक्षणाच्यादृष्टीने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (१६-१२-२०२१) :** (१) "क्ला" (कन्झर्वेशन लेन्सेस ॲण्ड वाईल्डलाइफ) या वन्यजीव क्षेत्रात कार्यरत असलेल्या संस्थेने वाघांच्या मृत्यूच्या संदर्भात तयार केलेला स्वतंत्र अहवाल शासनास उपलब्ध करुन

दिल्याचे आढळून आलेले नाही. तथापि, महाराष्ट्र राज्यातील वाघांच्या मृत्यूबाबतची अधिकृत नोंद मुख्य वन्यजीव रक्षक तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालयामार्फत ठेवण्यात येते.

(२) व (३) माहे जानेवारी, २०२१ ते माहे जुलै, २०२१ या कालावधीत नैसर्गिक कारणांमुळे-१५, रेल्वे अपघातात-१, विषप्रयोगामुळे-४, विद्युतप्रवाहामुळे-१ व शिकारीमुळे-२ असे एकूण २३ वाघांचा मृत्यू झाल्याच्या घटना निदर्शनास आल्या आहेत.

(४) राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण (NTCA) यांनी दिनांक १७/१२/२०१२ रोजी जारी केलेल्या मार्गदर्शक सुचनान्वये व प्रचलित नियमातील तरतूदीनुसार चौकशी अधिकारी यांचेकडुन कार्यवाही करण्यात येते. तसेच तस्करी अथवा शिकारीच्या प्रत्येक प्रकरणामध्ये चौकशी करुन प्रकरण न्यायप्रविष्ट करण्यात येते.

माहे जानेवारी, २०२१ ते माहे जुलै, २०२१ या कालावधीत विषप्रयोगामुळे-४, विद्युतप्रवाहामुळे-१, शिकारीमुळे-२ वाघांचा मृत्यू झाल्याच्या घटनामध्ये खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

- दिनांक ०१/०१/२०२१ रोजी उमरेड-पवनी-कऱ्हांडला अभयारण्यात प्रौढ वाघ-१ व बछडे-३ असे एकूण ४ वाघ विषबाधेने मृत झाल्याचे निदर्शनास आले आहे. प्रस्तुत प्रकरणाच्या चौकशीदरम्यान कालवडीच्या मालकाने विषप्रयोग करुन वाघाला मारल्याचे तपासात कबुल केले आहे. प्रस्तुत प्रकरण प्रथम श्रेणी न्यायदंडधिकारी यांचे न्यायालयात न्यायप्रविष्ट करण्यात आले आहे.
- एफ.डी.सी.एम. वन प्रकल्प विभागातील रिसाळा सिरोजो उपवनक्षेत्र, वारपाणी बिट येथे दिनांक २३/०३/२०२१ एक वाघ मृत झाल्याची घटना निदर्शनास आली असून सदर प्रकरणी वनगुनहा नोंदविण्यात येऊन पुढील चौकशी सुरु आहे.
- पांढरकवडा वनविभागातील मारेगाव वनक्षेत्रात दिनांक २३/०३/२०२१ रोजी वाघीणीच्या झालेल्या मृत्यू प्रकरणामध्ये ३ अरोपींना अटक करण्यात आली होती. सदर प्रकरणी न्यायालयाकडून आरोपींना जामिनावर सोडण्यात आले असून पुढील न्यायीक कार्यवाही सुरु आहे.

- पांढरकवडा वन विभागातील मुकुटबन वनक्षेत्रात दिनांक २५/०४/२०२१ रोजी वाघीणीच्या झालेल्या मृत्यू प्रकरणामध्ये २ अरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच दिनांक १९/०६/२०२१ रोजी पोलीस विभागाच्या मदतीने ५ संशयीत आरोपींना अटक करण्यात आली होती. सदर प्रकरणी न्यायालयाकडून आरोपींना जामिनावर सोडण्यात आले असून पुढील न्यायीक कार्यवाही सुरु आहे.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पात सायबर सेल तयार करण्यात आला असून राज्यात शिकारीच्या घटना घडल्यास सायबर डाटाच्या (कक्षाच्या) मदतीने आरोपींचा शोध घेण्यात येतो. तसेच जिल्हास्तरीय व्याघ्र समितीच्या बैठकीत वाघ/ बिबट इतर वन्यप्राण्यांच्या संरक्षणाच्या उपाययोजनांची आखणी करण्यात येते. अवैध शिकारीचे व इतर गुन्हे शोधणे व पुढील कार्यवाही करण्याकरीता आवश्यकतेनुसार पोलीस विभागाची मदत घेण्यात येते व प्रकरण न्यायप्रविष्ट करण्यात येते. या अनुषंगाने वनअधिकारी / कर्मचाऱ्यांना वेळोवेळी कायदेविषयक उजळणी प्रशिक्षण देण्यात येते.

व्याघ्र व इतर वन्यप्राण्यांच्या शिकारीवर आळा घालण्याच्यादृष्टीने क्षेत्रिय स्तरावर करण्यात येणाऱ्या उपाययोजना खालीलप्रमाणे आहेत.

- वन्यप्राण्यांचा मागोवा घेणे, कॅमेरा ट्रॅप लावणे.
- STPF पथकाद्वारे गस्त करणे, पावसाळ्यात विशेष गस्त करणे.
- गुप्त सेवा निधी उपलब्ध करुन देणे
- M-Stripes प्रणालीद्वारे वन्यप्राण्यांच्या गतिविधीवर लक्ष ठेवणे.
- विद्युत ट्रिपिंगवर लक्ष ठेवणे.
- पाणस्थळाची तपासणी करणे.
- संरक्षण कुटीतील वनमजुरांद्वारे वन्यप्राण्यांवर लक्ष ठेवणे.
- जंगलालगत विहिरीला कठडे बांधणे.
- जंगलात येणाऱ्या-जाणाऱ्या व्यक्तींची नोंद घेण्याकरीता मुसाफिर रजिस्टर ठेवणे, मुसाफिर लोकांचे डेरे तपासणे.
- वनातील / वनाशेजारी गावात जनजागृती करणे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोपरी (जि.ठाणे) परिसरातील खारफुटीची बेकायदेशीर वृक्षतोड होत असल्याबाबत

**(४) १०८११ (२०-११-२०२१) श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे तालुक्यातील १ हजार ३८७ हेक्टर खारफुटी क्षेत्र अधिसूचित करण्यात आले असून या परिसराला राखीव कांदळवन क्षेत्राचा दर्जा देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोपरी (जि.ठाणे) परिसरातील स्वामी समर्थ मठाच्या आवारामध्येही राखीव खारफुटी क्षेत्र असून या भागात बेकायदा बांधकामे सुरु असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाण्याच्या पूर्वेकडील खाडी किनाऱ्यावर मोठ्या प्रमाणात खारफुटीचे क्षेत्र असून या क्षेत्रात भराव टाकून अतिक्रमणे करुन भुमाफिया याठिकाणी चाळींचे बांधकाम करीत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ठाणे जिल्हयातील खारफुटीची वृक्षतोड करुन त्यावर अतिक्रमण करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीनूसार सदर ठिकाणी होणारे अतिक्रमण व अवैध वृक्षतोड थांबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (१३-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

श्री.स्वामी समर्थ मठाच्या आवारा व्यतिरिक्त इतर ठिकाणी भराव टाकून चाळीचे बांधकाम होत असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(४) सदर मागणीबाबतचे निवेदन अभिलेखात आढळून आले नाही. तथापि, मौजे मुंब्रा येथील खारफुटीच्या कत्तल झाल्याबाबत मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद यांचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(५) श्री.स्वामी समर्थ मठाच्या आवारामध्ये खोल्यांचे अनधिकृत बांधकाम झाल्याने वनपरिक्षेत्र भिवंडी, मुंबई कांदळवन संधारण घटक या कार्यालयामार्फत ७ आरोपीं विरुध्द भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम २६(१)(अ), (ड), (ह) अन्वये दिनांक २६/०९/२०२१ रोजी रौंड गुन्हा नोंदविण्यात येऊन सदर मालमत्ता जप्त करुन चौकशीकरीता ताब्यात घेतली आहे.

सदर प्रकरणी ६ आरोपींना दिनांक २६/०९/२०२१ रोजी अटक करण्यात आली असून त्यांना मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, ठाणे यांच्या न्यायालयात हजर केले असता, मा.न्यायालयांनी त्यांना दिनांक ११/१०/२०२१ पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली होती. तसेच एका आरोपीस मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, ठाणे यांच्याकडील आदेश क्र. पी.डी.जे/११८५२/२०२१, दिनांक ७/१०/२०२१ अन्वये दिनांक ०८/१०/२०२१ ते दिनांक १५/१०/२०२१ पर्यंत वनपरिक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, भिवंडी यांच्या कार्यालयात दररोज सकाळी १०.०० वाजता चौकशीकरीता हजर राहण्यास सांगितले. सदर प्रकरणी आरोपींचा जबाब नोंदविण्याची कार्यवाही चालू आहे.

सदर ठिकाणी अतिक्रमण व अवैध वृक्षतोड होऊ नये म्हणून वनपरिक्षेत्र, भिवंडी अंतर्गत वनपाल, वनरक्षक व महाराष्ट्र राज्य सुरक्षा मंडळाच्या सुरक्षा रक्षकांमार्फत गस्त करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ग्रामीण भागांमध्ये बिबट्याच्या हल्ल्यांमध्ये वाढ झाल्याबाबत

**(५) १०८९४ (०६-१२-२०२१) डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सातारा, पुणे व इतर ग्रामीण भागांमध्ये बिबट्याचे हल्ले वाढत असून यामध्ये अनेक लहान मुले व पाळीव प्राण्यांचा मृत्यू झाल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बिबट्याचा लोकवस्तीतील मुक्त वावर तसेच शिरकावामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानूसार बिबट्याचे लोकवस्तीतील हल्ले रोखण्यासाठी शासनाच्या वन विभागाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (२३-१२-२०२१) :** (१), (२) व (३) राज्यात दिनांक १ जानेवारी, २०२१ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ या कालावधीत बिबट या वन्यप्राण्याच्या हल्ल्यात १४ व्यक्तींचा मृत्यू झाला असून त्यामध्ये ५ लहान मुलांचा समावेश आहे. तसेच बिबट हल्ल्यात १०४४ इतक्या पाळीव प्राण्यांचा मृत्यू झाल्याच्या घटना निदर्शनास आल्या आहेत.

राज्यातील ग्रामीण भागात ऊसाच्या शेतीमुळे बिबट्यास कायमस्वरुपी लपण्याच्या जागा व पाण्याची सोय व उघड्या गोठ्यांमुळे सहज उपलब्ध होणारे भक्ष्य मिळाल्यामुळे बिबट्याने उसाची शेती असलेल्या भागात त्याचा अधिवास तयार केला आहे. अशा परिसरात बिबट्याने पाळीव प्राण्यांवर व मनुष्यांवर देखील हल्ले केल्याच्या घटना निदर्शनास आल्या आहेत.

वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तीच्या कायदेशीर वारसास व शेतपीक नुकसानीच्या तसेच पशुधन हानीच्या प्रकरणांमध्ये संबंधितास प्रचलित शासन निर्णयाच्या तरतुदीनुसार आर्थिक सहाय्य अदा करण्यात येते. त्याकरीता क्षेत्रिय स्तरावर ऊणे (-) प्राधिकाराची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

बिबट्यांचा लोकवस्तीजवळ वावर कमी करण्यासाठी तसेच मानव-वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या अनुषंगाने क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- वनक्षेत्रात तसेच वनक्षेत्राजवळच्या भागामध्ये दिवस-रात्र गस्त घालण्यात येते.
- मानव-वन्यप्राणी संघर्ष कमी करण्याच्यादृष्टीने स्थानिकांमध्ये जनजागृती करण्यात येते.

- वन्यप्राण्यांना वनक्षेत्रात पिण्याचे पाणी तसेच भक्ष्य उपलब्ध व्हावे याकरीता उपाययोजना करण्यात येतात.
- क्षेत्रिय अधिकारी/ कर्मचाऱ्यांना मानव-वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्यादृष्टीने प्रशिक्षण देण्यात आले असून त्यांना ट्रॅन्क्वीलायझर गन/ ब्लो पाईप, ट्रॅप कॅमेरा, पिंजरे इत्यादी साहित्य उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.
- आवश्यकतेनुसार वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ चे कलम ११ (१)(क) मधील तरतुदीनुसार व केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार मानवी जिवितास धोकादायक असलेल्या वन्यप्राण्यास जेरबंद करण्याची कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोनपेठ (जि.परभणी) नगरपरिषदेच्या विशेष लेखा परीक्षण अहवालात अनियमितता आढळून आल्याबाबत

**(६) १०९५१ (२०-११-२०२१) श्री.निलय नाईक, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनपेठ (जि.परभणी) नगरपरिषदेच्या विशेष लेखा परीक्षण अहवालातून तसेच सन १९९९ ते २०११ या कालावधीतील नियमित लेखापरीक्षण अहवालातून एकूण १३ कोटी २३ लाख २८ हजार रुपयांची अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आक्षेपित रकमांची जबाबदारी निश्चित करण्याबाबत नगरविकास विभागाने दिनांक १७ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, परभणी यांना आदेशित केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हाधिकारी, परभणी यांनी संबंधितांवर जबाबदारी निश्चित केली आहे काय, तसेच जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे, त्यानूसार आक्षेपित रकमांची वसूली संबंधितांकडून करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-१२-२०२१) :** (१) अंशतः खरे आहे.

सोनपेठ (जि.परभणी) नगरपरिषदेच्या विशेष लेखा परीक्षण अहवालात रुपये ९,५५,०५,३७५/- इतकी आक्षेपाधिन रक्कम दर्शविली असून, रुपये १८,१३,९९४/- इतकी रक्कम वसूल पात्र होती.

(२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी वसूलपात्र रक्कम सोनपेठ नगरपरिषदेने संबंधित गुत्तेदाराकडून वसूल करुन शासनखाती भरणा केली आहे.

तसेच तत्कालीन लेखापाल, लेखा विभाग, सोनपेठ नगरपरिषद यांच्यावर विशेष लेखा परीक्षण अहवालातील आक्षेपित रकमांची जबाबदारी निश्चित करुन, त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील नियम १० नुसार पुढील दोन वेतनवाढी तात्पुरत्या थांबविण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई-गोवा महामार्गाचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत

**(७) १०९९७ (०६-१२-२०२१) श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.अभिजित वंजारी, श्री.मोहनराव कदम, श्री.जयंत आसगावकर, श्री.विनायकराव मेटे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अनिकेत तटकरे : तारांकित प्रश्न क्रमांक ६३८५ ला दिनांक १० मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गाचे काम कंत्राटदारांचा मनमानी कारभार, शासकीय अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष आणि प्रचंड गैरव्यवहार यामुळे गत १२ वर्षे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे या महामार्गावर अपघातात सुमारे अडीच हजार लोकांचा बळी गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर महामार्गाचे काम निर्धारित वेळ ठरवून तातडीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-१२-२०२१) :** (१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ च्या पनवेल ते इंदापूर या ८४ कि.मी. लांबीतील चौपदरीकरणाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या (NHAI) अखत्यारीत येते. सदर काम त्यांचेमार्फत माहे डिसेंबर, २०११ पासून प्रगतीपथावर असून सद्य:स्थितीत सुमारे ८८ टक्के काम पूर्ण झाले आहे. तथापि, सदर कामाच्या विलंबास कर्नाळा पक्षी अभयारण्य व संवेदनक्षील क्षेत्र (Eco-sensative Zone कि.मी.० ते कि.मी.२०) मधील राष्ट्रीय वन्यजीव मंडळ यांची मंजुरी प्राप्त होणे व मौजे काराव येथील भूसंपादन व वडखळ बाहय वळणाकरीता मिठागराची जागा हस्तांतरीत होणे, मौजे नागोठणे व कोलेटी येथील सरकारी जागेवरील अतिक्रमण काढणे, सवलतदाराच्या आर्थिक समस्या इत्यादी बाबी कारणीभूत ठरल्या आहेत, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पनवेल यांनी कळविले आहे.

त्याचप्रमाणे मुंबई-गोवा रा.म.६६ रस्त्याच्या इंदापूर ते झाराप (कि.मी.८४/०० ते कि.मी.४५०/१७०) या एकूण ३५५.२८५ कि.मी. लांबीतील चौपदरीकरणाचे काम राज्य शासनाच्या राष्ट्रीय महामार्ग मंडळ, नवी मुंबई यांचेमार्फत (NH, PWD) प्रगतीपथावर आहे. सदर लांबीतील चौपदरीकरणाच्या प्रारुप आराखड्यास माहे जून, २०१३ मध्ये मंजुरी प्राप्त झाल्यानंतर भूसंपादन प्रक्रिया हाती घेवून सुमारे ९० टक्के भूसंपादन झाल्यानंतर माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये प्रत्यक्ष काम हाती घेण्यात आले. सद्य:स्थितीत एकूण ३५५.२८५ कि.मी. लांबीपैकी २१०.५८० कि.मी. लांबीतील काम पूर्ण झाले असून उर्वरीत काम प्रगतीपथावर आहे. सदर काम लवकर पूर्ण करण्यासाठी विविध स्तरांवर वेळोवेळी आढावा बैठका घेण्यात येऊन कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

मुंबई-गोवा या राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ वरील अपघातात सुमारे अडीच हजार लोकांचा बळी गेला नसून सदर महामार्गाच्या पनवेल ते इंदापूर कि.मी. ००.०० ते कि.मी. ८४.०० या लांबीत सन २०१२ ते २०२० या कालावधीत ३९० जण मृत्यूमुखी पडले आहेत, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पनवेल यांनी कळविले आहे.

तसेच मागील पाच वर्षात पोलीस खात्याकडील प्राप्त आकडेवारीनुसार इंदापूर ते झाराप (कि.मी.८४/०० ते कि.मी.४५०/१७०) या लांबीमधील अपघातात ३९७ जण मृत्यूमुखी पडले आहेत.

(३) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर असलेले काम सुमारे ८८ टक्के पूर्ण झाले आहे. तथापी उर्वरीत काम पूर्ण करण्याच्या दृष्टिने मूळ सवलत करार समाप्त करण्याचे आदेश दिनांक १७/११/२०२१ रोजी निर्गमित करण्यात आले असून उर्वरीत कामासाठी नवीन कंत्राटदार नियुक्त करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर उर्वरीत काम माहे जून, २०२२ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पनवेल यांनी कळविले आहे.

तसेच राज्य शासनाच्या राष्ट्रीय महामार्ग मंडळ, नवी मुंबई यांचेमार्फत (NH, PWD) हाती घेण्यात आलेल्या इंदापूर ते झाराप या लांबीतील कशेडी ते पर्शुराम घाट व वाटूळ ते झाराप लांबीतील काम जवळपास पूर्ण झाले आहे. उर्वरीत लांबीपैकी वडपाले ते कशेडी या लांबीतील काम सुमारे ७० टक्के पूर्ण झाले असून सदर काम तसेच इंदापूर ते वडपाले व पर्शुराम घाट ते आरवलीच्या कामांची प्रगती लक्षात घेवून देण्यात आलेल्या मुदतवाढीनुसार सदर काम जून, २०२२ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

तथापि, आरवली ते वाकेड लांबीतील उर्वरीत कामांकरीता पर्यायी कंत्राटदार नियुक्त करण्याची प्रक्रिया हाती घेण्यात आली असून त्यानुसार सदर कामे माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर (पूर्व) येथील डम्पिंग यार्ड शहराबाहेर नेण्याबाबत

**(८) ११०७४ (२०-११-२०२१) श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.मोहनराव कदम, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर (पूर्व) येथील डम्पिंग यार्डवर गत ५० वर्षांपासून दररोज १ हजार टनापेक्षा अधिक कचरा जमा करण्यात येत असून या कचऱ्याच्या दुर्गंधीमुळे नागरिकांमध्ये आरोग्याची समस्या निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागात बहुतांश झोपडपट्टया असून सदर झोपडपट्यांमधील नागरिकांना या डंपिंग यार्डमुळे नाहक त्रास होत असून दूषित पाणी, रस्ते, वीज इ. समस्यांना सामोरे जावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी डम्पिंग यार्ड शहराबाहेर नेण्याबाबत तसेच येथील झोपडपट्टीवासियांची समस्या सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२४-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

नागपूर शहरामध्ये सन २०१२ पासून सरासरी १००० मेट्रीक टन प्रतिदिन कचरा संकलित केला जात आहे. सदर कचऱ्याच्या दुर्गंधीबाबत परिसरातील नागरिक तसेच लोकप्रतिनिधी यांचेकडून तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.
(२) व (३) हे खरे नाही.

भांडेवाडी डम्पिंग यार्ड येथील जागा कंम्पोस्ट डेपो म्हणुन आरक्षित आहे. यालगत तयार झालेल्या झोपडपट्ट्या प्रस्तावित बफर झोनमध्ये वसलेल्या आहेत. सद्य:स्थितीत सदर वस्त्यांमध्ये बहुतांश जलवाहिन्यांद्वारे आणि महानगरपालिकेच्या टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत असून दूषित पाण्याच्या तक्रारी प्राप्त नाहीत. तसेच सदर वस्त्यांमध्ये डांबरी रस्ते व खडीकरण रस्ते असून विद्युतविषयक सुविधा उपलब्ध आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धारावी पुनर्वसन प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(९) १११०९ (२०-११-२०२१) श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.चंदूभाई पटेल : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक ३१९३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारावी पुनर्विकास प्रकल्प सुमारे १६ वर्षे प्रलंबित असून सदर प्रकल्पाची निविदा तत्कालिन शासनाच्या कार्यकाळात अंतिम होऊन कंत्राटदाराची निवड करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रेल्वेच्या जागेचा तांत्रिक मुद्यामुळे सदर प्रक्रिया थांबवली गेली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रेल्वेच्या जमिनीच्या मुद्याचे निराकरण होऊन नव्याने निविदा प्रकिया अद्याप सुरू न झाल्यामुळे सदर प्रकल्प प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, धारावी पुनर्विकास प्रकल्पाची सुरुवात तातडीने करून हा प्रकल्प मार्गी लावण्याकरीता शासन कोणत्या उपाययोजना करणार वा करीत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (१३-१२-२०२१) :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) धारावी पुनर्विकास प्रकल्पात रेल्वेच्या जागेच्या हस्तांतरणाबाबत झालेल्या सामंजस्य करारातील अटी व शर्तीनुसार दिनांक २८/०५/२०१९ च्या शासन निर्णयानुसार रुपये ८००/- कोटी रकमेचा आगाऊ भरणा (Upfront Amount) रेल्वेस अदा करण्यात आला आहे. सामंजस्य करारानुसार रेल्वेने मोकळी तसेच कार्यात्मक (Operational) जमीन धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या ताब्यात अद्याप दिलेली नाही. याबाबत रेल्वेशी वारंवार पत्रव्यव्हार करण्यात आला आहे.

धारावी पुनर्विकास प्रकल्पाची निविदा प्रक्रिया रद्द केल्यामुळे अधिकतम निविदाकार यांनी मा.उच्च न्यायालयात दिनांक २३/११/२०२० रोजी याचिका दाखल केली आहे. प्रकरण न्याय प्रविष्ट आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

## सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना त्यांच्या प्रवर्गातून कामे करण्याच्या कमाल मर्यादेची अट रद्द करण्याबाबत

**(१०) १११६५ (०६-१२-२०२१) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्वसाधारण कंत्राटदाराने वर्षानुवर्षे केलेल्या कामांमुळे त्यांची आर्थिक क्षमता वाढते त्यामुळे बेरोजगार अभियंते शासन निर्णय क्र.सीएटी २०१७/प्र.क्र.६९/इमारत-२, दिनांक ३१ मे, २०१८ व शासन शुध्दीपत्रक क्रमांक सीएटी २०१७/प्र.क्र.६९/ इमारती-२, दिनांक १६ ऑगस्ट, २०१८ नुसार सर्वसाधारण कंत्राटदाराप्रमाणे नोंदणी करुन कामे करताना त्यांच्या स्पर्धेत टिकत नसल्याने सदर शासन शुध्दीपत्रकामध्ये बदल करुन सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना त्यांच्या प्रवर्गातून कमाल कामे करण्याची मर्यादा ३० लक्ष व त्या श्रेणीतून स्पर्धा करुन करावयाची एकूण कामाची किंमत १०० लक्ष ही अट रद्द केल्यास, अधिकाधिक अभियंते या व्यवसायात कायमस्वरुपी येतील व शासनाची कामे वेळेत व गुणवत्तापूर्वक होण्यास मदत होईल अशी मागणी बेरोजगार अभियंते यांनी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना त्यांच्या श्रेणीतून स्पर्धा करुन कामे करताना कुठलीही कमाल मर्यादा न ठेवता, कामे स्पर्धात्मक व गुणवत्तेची होण्यासाठी निविदा भरताना सदर निविदेसाठी त्या स्वरुपाचे व निविदा किंमती एवढे काम केलेले असण्याची अट बंधनकारक केल्यास कामासाठी लागणारा तांत्रिक अनुभव व आर्थिक क्षमता त्या सुशिक्षित बेरोजगार अभियंत्याकडे असेल व सदर कामे वेळेत उच्च गुणवत्तेने पूर्ण करु शकेल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीनूसार सदर अट रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोक चव्हाण (२०-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांच्या विविध समस्या व मागणी विचारात घेऊन स्थापत्य बेरोजगार अभियंत्यांना प्रथम वर्ग नोंदणीमध्ये वाढ करण्यात आली असून वर्ग ५ (रुपये ५० लक्ष) ऐवजी वर्ग ४ (रुपये १५० लक्ष) मध्ये नोंदणी देण्यात येत आहे. या व्यतिरिक्त स्थापत्य बेरोजगार अभियंत्यांना विनास्पर्धा देण्यात येणाऱ्या कामांच्या रकमेमध्ये रुपये ७५ लक्ष ऐवजी रुपये १०० लक्ष रकमेपर्यंत वाढ करण्यात आली असून विनास्पर्धा देण्यात येणाऱ्या कामाची कमाल किंमत रुपये २० लक्ष मध्ये वाढ करुन रुपये ३० लक्ष करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार निविदांना अपेक्षीत प्रतिसाद व निकोप तसेच स्पर्धात्मक देकार प्राप्त होण्याच्यादृष्टीने सुस्पष्ट व सर्वंकष पूर्वअर्हता आवश्यक आहे. यास्तव निविदा मागविताना कामाची व्याप्ती व स्वरुप विचारात घेऊन कंत्राटदाराचा कामाचा अनुभव व आर्थिक सक्षमता निश्चित करणे अत्यावश्यक असल्याने निविदा भरताना सदर निविदेसाठी केवळ त्या स्वरुपाचे व निविदा किंमतीएवढे काम केलेले असण्याची अट बंधनकारक करणे संयुक्तिक नाही. तसेच सर्व सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना स्पर्धेत संधी मिळण्याच्यादृष्टीने त्यांच्या श्रेणीतून स्पर्धा करून कामे करताना कमाल मर्यादा ठेवण्यात आली आहे.

---

## मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील तळाशिल येथील समुद्र किनारी धुपप्रतिबंधक बंधाऱ्याचे काम पूर्ण करण्याबाबत

**(११) १११९९ (२०-११-२०२१) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील तळाशिल येथील समुद्र किनारी धुपप्रतिबंधक बंधाऱ्याचे प्रलंबित असलेले १४०० मीटरचे काम पूर्ण करण्यासाठी तळाशिल ग्रामस्थांनी वारंवार शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ठिकाणी उधाणाच्यावेळी समुद्राचा तळाशिल गावाला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दोन वर्षापूर्वी शासनस्तरावर मंजूर झालेल्या या बंधाऱ्याचे निधीअभावी दोन्ही टप्प्यातील कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार उक्त बंधाऱ्याकरीता निधी उपलब्ध करून सदर काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (०७-१२-२०२१) :** (१) व (२) होय.
(३) नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) सन २०१७-१८ चे अर्थसंकल्पात तळाशिल येथे समुद्र धूपप्रतिबंधक बंधारा बांधणे या २२३ मी. लांबीचे कामासाठी रुपये १.८० कोटीची तरतूद करण्यात आली आहे. तसेच सदर कामाकरीता सन २०२१-२०२२ अर्थसंकल्पात रुपये १७.९७ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर कामास केंद्रीय जल आणि विद्युत अनुसंधान केंद्र (CWPRS), खडकवासला, पुणे कडून काटछेद प्राप्त झाले असून तांत्रिक मान्यतेसाठी अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. सद्य:स्थितीत कांदळवन मंजूरी अप्राप्त आहे.

---

## बोरामणी विमानतळासाठी ३३.७२ हेक्टर जमिनीच्या निर्वणीकरणाबाबत

**(१२) ११२०८ (०६-१२-२०२१) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापुर जिल्ह्यातील नियोजित बोरामणी विमानतळासाठी भुसंपादनाची कार्यवाही पूर्ण झालेली असून निर्वणीकरणाची प्रक्रिया अजुनही पूर्ण झाली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बोरामणी ते माळढोक पक्षाचे वास्तव्य असलेला परिसर यामध्ये ३० कि.मी. पेक्षा अधिक अंतर आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बोरामणी विमानतळासाठी ३३.७२ हेक्टर जमिनीच्या निर्वणीकरणाचा प्रस्ताव माळढोकचे कारण पुढे करत वन विभागाने नामंजूर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, निर्वणीकरणासाठी शासनापुढे कोणते पर्याय आहेत, तसेच निर्वणीकरणाचा पुनर्विचार प्रस्ताव दाखल करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (०७-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) राज्य शासनाने सोलापूर जिल्हयातील नियोजित बोरामणी येथील ग्रीनफिल्ड विमानतळासाठी ३३.७२ हेक्टर वनजमीन वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वळती करणेबाबतचा प्रस्ताव केंद्रीय पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालयास सादर केला होता. सदर नियोजित विमानतळ व माळढोक पक्षी अभयारण्य, गंगेवाडी यामधील हवाई अंतर सुमारे ७.६४ कि.मी. आहे. माहे मार्च/ एप्रिल, २०२१ दरम्यान सर्व्हेक्षणामध्ये सदर क्षेत्रामध्ये एक माळढ़ोक पक्षी आढळून आला. नियोजित विमानतळासाठी आवश्यक वनक्षेत्र धोकाग्रस्त माळढोक पक्षाच्या धोकाग्रस्त प्रजाती अधिवास क्षेत्रात मोडते. या नियोजित विमानतळाच्या सुमारे २५० कि.मी. अंतरात इतर ४ विमानतळ आहेत. या कारणांमुळे केंद्र शासनाने वनजमीन वळतीकरणाचा प्रस्ताव नामंजूर केला आहे. प्रकल्प यंत्रणेकडून पुनर्विचार प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी संग्रहालयाचे नामकरण गोंडवाना आंतरराष्ट्रीय प्राणी संग्रहालय करणेबाबत

**(१३) ११२५८ (११-११-२०२१) श्री.प्रवीण दटके, डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूरसह विदर्भातील सर्व जिल्हे हे गोंडवाना प्रदेश म्हणून ओळखले जातात आदिवासी भागाची अस्मिता या भागाशी जुळलेली असून गोरेवाडा संग्रहालयाचे नामकरण गोंडवाना करणेबाबत मागणी होत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोरेवाडा संग्रहालयाचे नामकरण गोंडवाना करणेबाबत आदिवासी समाजाने वेळोवेळी तीव्र आंदोलने केली असून नागपूर येथील लोकप्रतिनिधींनी गोंडवाना नामकरण करण्याची मागणी लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने आदिवासी जनतेच्या मागणीचा सकारात्मक विचार करुन गोंडवाना संग्रहालय नामकरण होण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (२२-११-२०२१) :** (१), (२), (३) व (४) विदर्भात नागपूर, गोंदिया, भंडारा, वर्धा, चंद्रपूर आणि गडचिरोली या ६ जिल्हयांचा समावेश आहे. विदर्भातील काही भाग आदिवासी बाहुल्य असलेला आहे ही वस्तुस्थिती आहे.

गोरवाडा आंतरराष्ट्रीय प्राणीसंग्रहालय, नागपूर याचे नामकरण “गोंडवाना आंतरराष्ट्रीय प्राणी उद्यान, नागपूर” असे करण्यात यावे अशा स्वरुपाची मागणी विविध संस्थांमार्फत लेखी निवेदनाद्वारे करण्यात येत आहे.

तथापि, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक :- डब्ल्युएलपी-०१.२१/प्र.क्र. १६/फ-१, दिनांक १९/०१/२०२१ अन्वये शासन स्तरावर सर्वंकष विचार करुन गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणीसंग्रहालय, नागपूर याचे नामकरण “बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी उद्यान, नागपूर” असे करण्यात आले आहे.

---

## बांद्रा (मुंबई) येथील शासकीय वसाहतीची दुरुस्ती करणेबाबत

**(१४) ११३४२ (०६-१२-२०२१) श्री.सुरेश धस :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बांद्रा (मुंबई) येथील शासकीय अधिकारी/कर्मचारी वसाहतीची प्रचंड पडझड होवुन दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बहुतांश ठिकाणी स्लॅबचा थरही निखळून खाली पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या जिवीतास धोका होवु नये म्हणुन या वसाहतीच्या तात्काळ दुरुस्तीसाठी शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (२०-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतीतील इमारतीचे संरचनात्मक परीक्षण करण्यात आले असून धोकादायक असलेले स्लॅबचा गिलावा/ कॉक्रिट निखळून पडण्याच्या स्थितीत असल्यास तो पाडून घेण्यात येत आहे. त्याचप्रमाणे तातडीच्या अत्यावश्यक दुरुस्तीकरीता सन २०२१-२२ करीता रुपये २०८८.५२ लक्ष रक्कमेचा दुरुस्ती कार्यक्रम मंजूर करण्यात आला असून त्यानुषंगाने पुढील आवश्यक कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची महात्मा फुले व्यापारी संकुल व सभागृहाची जागा पुनर्विकासाच्या नावाखाली खाजगी विकासकाला दिल्याबाबत

**(१५) ११३९२ (०६-१२-२०२१) श्री.रामराव पाटील :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची महात्मा फुले व्यापारी संकुल व सभागृहाची जागा पुनर्विकासाच्या नावाखाली खाजगी विकासकाला शासनाची कोणतीही मान्यता न घेता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिका अधिनियम कलम ७९ मधील नियम २०१९ चा अवलंब न करता माहे जानेवारी ते मार्च, २०२० दरम्यानच्या कालावधीत ९० वर्षासाठी लिजवर देवुन तेथील संकुलातील जुन्या भाडेकरूंना महानगरपालिकेच्या फुटपाथ, सायकल ट्रॅक व रस्ता पार्किंगच्या जागेत विकासकास शेड उभारून तात्पुरती जागा वापरण्यास दिली असून याकरीता वाहतूक पोलीस विभागाची NOC घेतली आहे काय,

(३) असल्यास, सदर जागा पीआर कार्डवर मालमत्ता व्यवस्थापक यांच्या नावे नोंद असताना विकासकाला जागा हस्तांतरण व लिजचा करार करण्यासाठी अभियांत्रिकी पदविकाधारक पदोन्नत कार्यकारी अभियंता यांना अधिकार प्रदान केले असून सदर करार करण्याचा अधिकार व अर्हता असलेला तांत्रिक अधिकारी नसल्याने होणाऱ्या नुकसानाची जबाबदारी घेण्यास महानगरपालिकेकडे पूर्ण वेळ विधी अधिकारी आहेत काय,

(४) असल्यास, खाजगी विकासकाने निविदा मंजुरीनंतर १५ दिवसात स्वतः, पत्नी व इतर एक जणांच्या नावाने दुसरी नवीन कंपनी स्थापन करून सदर कंपनीची उलाढाल पुरेशी नसताना नवीन कंपनीसोबत करार करून दाखल केलेले एमओयू मान्य करून सदर नवीन कंपनीला काम हस्तांतरित केले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर कंपनीचे भाग भांडवल किती आहे, तसेच सदर SPV कंपनी बांधकाम बाबतीतचे नियम व अटी नुसार मान्यता प्राप्त नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चोकशीत काय आढळून आले, चौकशीनूसार दोषींवर कारवाई करण्यासाठी शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

महात्मा फुले मार्केट येथील जुन्या इमारतीमधील भाडेकरु यांच्या व्यवसायावर परिणाम होवू नये, या उद्देशाने महानगरपालिकेच्या जागेत तात्पुरती टिन शेड उभारण्यात आली आहे. सदर टिन शेडमुळे वाहतुकीस अडथळा होत नसल्यामुळे वाहतूक पोलिसांकडून ना-हरकत घेण्यात आलेली नाही.

(३) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६९(१) नुसार महानगरपालिका आयुक्त यांनी त्यांना प्राप्त अधिकारान्वये सदर करारनामा करण्यास कार्यकारी अभियंता यांना प्राधिकृत केलेले असून, महानगरपालिकेमध्ये पूर्णवेळ विधी अधिकारी पदस्थ आहेत.

(४) या कामाकरीता प्रसिध्द करण्यात आलेल्या निविदेतील खंड ४.०५.१६.१ मधील तरतूदीनुसार विकासकाने जय सन्मान प्रा.लि.या नावाने एस.पी.व्ही. स्थापन केले असल्याचे महानगरपालिकेस कळविल्याने सदर कंपनीसोबत महानगरपालिकेने नियमानुसार करारनामा केला आहे.

(५) निविदेतील खंड ४.०५.१६ अन्वये पात्र विकासक हे SPV चे कोअर प्रमोटर्स असणे आवश्यक आहे. त्यांची भागीदारी ५० टक्क्यांपेक्षा कमी नसावी व त्यांचे इतर भागीदार यांची कमीत कमी २० टक्के असणे आवश्यक आहे. त्यानुसार पात्र विकासक हे कोअर प्रमोटर्स म्हणून ५४ टक्के भागीदार असून इतर दोन भागीदार यांची प्रत्येकी २३ टक्क्याप्रमाणे भागीदारी आहे.

तसेच पात्र विकासक यांच्याकडे निविदेतील अटी व शर्तीनुसार बांधकामबाबतचे नियम व अटी बाबतची अर्हता आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात जीएसटी अंमलबजावणीनंतर शासकीय कंत्राटात झालेल्या बदलांमुळे उद्‌भवलेल्या अडचणींबाबत

**(१६) ११३९९ (०६-१२-२०२१) श्री.प्रवीण दटके, डॉ.परिणय फुके, श्री.रमेश कराड, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जीएसटी अंमलबजावणीनंतर शासकीय कंत्राटात झालेल्या बदलांमुळे उद्भवलेल्या अडचणींबाबत राज्यात दिनांक १ ऑगस्ट, २०१९ पासून जीएसटी करप्रणाली लागू झाली. तत्पूर्वी कार्यादेश दिलेल्या आणि दिनांक १ जुलै, २०१७ नंतर पूर्णत्वास आलेल्या कामांच्या बाबतीत जीएसटीमुळे अतिरिक्त भार पडत असल्यास (व्हॅट व इतर कर कपाती नंतर) तफावतीच्या रकमेबाबत कंत्राटदाराने कार्यकारी अभियंताकडे मागणी करावी अशा सूचना नागपूर महानगरपालिकेच्या परिपत्रकाद्वारे व शासन निर्णयानुसार करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापही कंत्राटदाराने फरकाच्या परतावा मागणीसाठी केलेले विनंती पत्र स्वीकारण्यास शासन तयार नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १० ऑक्टोबर, २०१७ रोजीचे नागपूर महानगरपालिकेच्या परिपत्रक व शासन निर्णय दिनांक १९ सप्टेंबर, २०२१ द्वारे सूचित केलेल्या निर्देशानुसार कार्यवाही होण्यास अथवा कंत्राटदाराकडून मागणीचे प्राथमिक अर्ज स्वीकारण्यास विलंब व हेतुपुरस्सर टाळाटाळ होत असल्याबाबत लेखी निवेदनाद्वारे लोकप्रतिनिधींनी विचारणा केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन निर्णयाची व महानगरपालिकेच्या परिपत्रकाची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२४-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) लेखी निवेदन प्राप्त झाले आहे.

(४) मुख्य अभियंता नागपूर महानगरपालिका, नागपूर यांनी त्यांच्या दिनांक ३०/०७/२०२१ च्या पत्रान्वये सर्व विभाग प्रमुख, नागपूर महानगरपालिका यांना फरकाची रक्कम संकलित करण्याबाबत सुचना देण्यात आल्या असून संकलनाची कार्यवाही महानगरपालिकास्तरावर सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यातील वाकड-पाली-खोपोली राज्य महामार्ग क्र. ५४८(अ) च्या रूंदीकरण, मजबूतीकरण व डांबरीकरणाच्या कामाबाबत

**(१७) ११४३३ (२०-११-२०२१) श्री.प्रसाद लाड, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील वाकड -पाली- खोपोली या राज्य महामार्ग क्र. ५४८(अ) च्या रूंदीकरण, मजबुतीकरण, खडीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामासाठी १९८ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होऊनसुध्दा सदरहू महामार्गाच्या संथ व अर्धवट कामामुळे तसेच योग्य नियोजनाच्या अभावामुळे या महामार्गाची ठिकठिकाणी दुरवस्था झाली असल्याने या मार्गावरून प्रवास करणे अत्यंत त्रासदायक होत असून या महामार्गावर मोठ्या प्रमाणात अपघात होत असून अनेकांना आपला जीव गमवावा लागला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महामार्गाचे काम मागील ३ वर्षापासून सुरू असून सदर महामार्गाचे काम अपूर्णावस्थेत असून निकृष्ट दर्जाच्या कामामुळे करोडो रूपये खर्च करूनही प्रवाश्यांना त्रास सहन करावा लागत आहे व वाहनांमध्ये मोठ्या प्रमाणावर बिघाड होत असून वाहनधारकांना न परवडणारा खर्च सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपूर्ण कामाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या महामार्गाचे काम शीघ्रगतीने हाती घेऊन पूर्ण करण्याच्यादृष्टीने तसेच कामास विलंब करणाऱ्या संबंधित अधिकारी व कंत्राटदाराविरोधात कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१३-१२-२०२१) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग विभागाने (MoRTH) वाकण-पाली-खोपोली हा रस्ता नव्याने घोषित राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ अ मध्ये अंतर्भुत केला असून, दिनांक २३ जून, २०१७ रोजी म.रा.र.वि. महामंडळाकडे राष्ट्रीय महामार्ग दर्जोन्नतीसाठी वर्ग झाला आहे.

सद्य:स्थितीत कामाची भौतिक प्रगती ७१.३८% व आर्थिक प्रगती ४९.३९% इतकी झाली असून, उर्वरीत काम प्रगती पथावर असून, माहे मार्च, २०२१ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

ई.पी.सी. कंत्राटदार मे. वराह इन्फ्रा लि. यांचेव्दारे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये काम सुरु केल्यानंतर, स्थानिक लोकांव्दारे पुर्वी सन १९७४ साली झालेल्या भुसंपादनाचा मावेजा न मिळाल्याचे आक्षेप घेत, ठिकठिकाणी काम बंद करुन कामात अडथळा आजपर्यंत केला जात आहे.

तसेच, COVID-१९ च्या पार्दुभावादरम्यान कामाची गती मंदावली होती, जी सद्य:स्थितीत सुरळीत करण्यात आली आहे.

(२) व (३) नाही, हे खरे नाही.

सदर कामावर MoRTH Empaneled Authority Engineer ची नेमणुक केली असून, दैनंदीन कामाच्या IRC माणकाप्रमाणे चाचण्या केल्या जातात व त्यानुसार कामाची दर्जा व्यवस्थित आहे. तसेच, सदर कामादरम्यान ई.पी.सी. कंत्राटदारामार्फत झालेल्या दिरंगाईकरीता कंत्राटदारास वेळोवेळी नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील अतिक्रमणे हटविण्याबाबत

**(१८) ११४६१ (०६-१२-२०२१) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील अतिक्रमणे हटविण्याचे निर्देश मा.मुंबई उच्च न्यायालयाने सन २००४ मध्ये दिलेले असताना आजतागायत १७ वर्षानंतरही वन विभागाला येथील अतिक्रमणे हटविण्यात अपयश आले असून सन २००४ मध्ये २०० हेक्टर असलेल्या अतिक्रमित क्षेत्रात वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उद्यानाच्या हद्दीत सध्या झोपडपट्टीचे साम्राज्य दिसत असून कांदिवली येथील दामूनगर, आकुर्ली, पोईसर तसेच येऊर, ठाणे, मुलुंड या भागातील राष्ट्रीय उद्यानाच्या जमिनीवर दिवसेंदिवस अतिक्रमण वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गतवर्षी साईबागोडा या ठिकाणी १०० एकर जमिनीवर अतिक्रमण झाले आहे, तसेच सन १९९५ मध्ये दाखल झालेल्या याचिकेवर निर्णय देताना उच्च न्यायालयाने अतिक्रमण हटविण्याचे निर्देश दिले होते मात्र अद्याप हे निर्देश पाळले गेले नाहीत. त्यामुळे या प्रकरणी मा.मुख्यमंत्री, प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) यांचेकडे एक सविस्तर निवेदन वनसक्ती संस्थेने माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये पाठविलेले असून सदर निवेदनात त्यांनी मानवी हस्तक्षेपामुळे उद्यानातील जैवविविधतेचे नुकसान होत आहे, पट्टेदार तरसासारख्या प्रजाती नष्ट झाल्या आहेत आदी विविध बाबीसंदर्भात स्पष्ट उल्लेख करून शासनाने या प्रकरणी अतिक्रमणा विरोधात विनाविलंब कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू निवेदनातील मागण्याच्यानुषंगाने तसेच मा.उच्च न्यायालयान, मुंबई यांनी एका याचिकेवर सन २००४ मध्ये निर्णय देताना अतिक्रमण हटविण्याचे दिलेल्या निर्देशनाची विनाविलंब अंमलबजावणी करण्याच्यादृष्टीने कोणती कायवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (१६-१२-२०२१) :** (१) मा.उच्च न्यायालयाने दिनांक ०७/०५/१९९७ रोजी रिट याचिका क्रमांक ३०५/९५ मध्ये संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील पात्र अतिक्रमकांचे पुनर्वसन करुन वनक्षेत्रावरील अतिक्रमण निष्कासीत करण्याचे आदेश पारित केले आहेत. पात्र अतिक्रमकांचे पुनर्वसन करुन व इतर अनधिकृत अतिक्रमण निष्कासीत करुन तत्कालीन २०० हे. अतिक्रमित क्षेत्रापैकी ७० हे. क्षेत्र मोकळे करण्यात आले आहे. उर्वरित १३० हे. क्षेत्रावरील पात्र अतिक्रमकांचे पुनर्वसन वनक्षेत्राबाहेर करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(२) हे खरे नाही. तथापि, ठाणे जिल्हयातील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या क्षेत्रामध्ये वनहक्क कायद्यांतर्गत एकूण १४८८ अतिक्रमकांचे ७७५.६५७ हे. क्षेत्रावरील वनहक्क दावे प्रलंबित असल्याने निष्कासनाची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(३) माहे मार्च, २०२० मध्ये साई बांगोडा येथिल वनखंड क्र. ११४८ सर्वे क्रमांक १८८ मधील राखीव वनक्षेत्रात स्थानिकांनी प्रामुख्याने शेतीकरीता अतिक्रमण केल्याची बाब निदर्शनास आली होती. प्रस्तुत प्रकरणी जैवविविधतेवर होणारा प्रतिकुल परिणाम विचारात घेता भारतीय वन अधिनियम, १९२७ अंतर्गत गुन्हे नोंदवून अतिक्रमण निष्कासीत करण्याची कार्यवाही करुन ५ हे. क्षेत्रावरील अतिक्रमण निष्कासीत करण्यात आले आहे. तसेच तरस ही प्रजाती संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या क्षेत्रात दुर्मिळ असल्याने सदर प्रजात नष्ट झाले म्हणणे योग्य नाही.

(४) मा.उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये ७० हे. क्षेत्रावरील अतिक्रमण निष्कासीत करण्यात आले आहे. तसेच नव्याने होणाऱ्या अतिक्रमणावर वेळीच कार्यवाही करुन अतिक्रमण निष्कासीत करण्यात येते. दुसऱ्या टप्प्यातील पात्र अतिक्रमकांचे पुनर्वसन जलदगतीने मार्गी लावण्याकरीता दिनांक ३०/०९/२०२१ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या बैठकीमध्ये पुनर्वसनाकरीता आरे व्यतिरीक्त इतर जागा निश्चित करण्यासाठी मा.मंत्री, पर्यावरण, पर्यटन व राजशिष्टाचार तथा पालक मंत्री, मुंबई उपनगर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्याच्या शासकीय सेवांमध्ये नोकर भरती करतांना देण्यात येणारे विविध संदर्भ,सामाजिक आरक्षण तसेच समांतर आरक्षण निश्चित करण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीच्या अहवालाबाबत

**(१९) ११४९७ (२०-११-२०२१) श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या शासकीय सेवांमध्ये नोकर भरती करतांना देण्यात येणारे विविध संदर्भ, सामाजिक आरक्षण तसेच समांतर आरक्षण निश्चित करण्यासाठी शासनाने प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली असल्याचे दिनांक १२ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील विविध बाबींसह आरक्षणासंदर्भात दाखल झालेले विविध दावे, याचिका व शासनाने त्यासंदर्भात काढलेल्या विविध आदेशांचा अभ्यास करणे तसेच मा.न्यायालयांच्या आदेशानुसार शासन निर्णयात कोणते बदल करणे आवश्यक आहे याही बाबींसंदर्भात राज्य शासनाला शिफारस/अहवाल सादर करण्याचे प्रस्तुत समितीवर बंधन घालण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रधान सचिव (सेवा) यांचे अध्यक्षतेखालील अभ्यास गटात श्री.सुमंत भांगे, श्रीमती मनिषा कदम, गीता कुलकर्णी, सु.मो.महाजन व टि.वा.करपते इत्यादि सदस्यांचा समावेश करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर समिती स्थापनेसंदर्भातील शासन निर्णय प्रत्यक्षात केव्हा निर्गमित करण्यात आला व त्याबाबत कोणकोणते निकष वा अटी घालण्यात आल्या आहेत व समितीने किती कालावधीत आपला अहवाल/शिफारशी शासनास सादर करण्याबाबत समितीला तत्संबंधित शासन आदेशानुसार कळविण्यात आले आहे,
(५) असल्यास, आतापर्यंत समितीच्या किती बैठका झाल्या आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री.उध्दव ठाकरे (२९-११-२०२१) :** (१) व (२) सामाजिक व समांतर आरक्षण संबंधित निर्णयाचे एकत्रिकरण करण्यासाठी अप्पर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११/०८/२०२१ च्या शासन निर्णयान्वये अभ्यासगटाची स्थापना करण्यात आली आहे.

सामाजिक व समांतर आरक्षणासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या व मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार शासन निर्णयात सुधारणा करणे आवश्यक आहे किंवा कसे याबाबत व आरक्षणाबाबतच्या सर्व शासन निर्णयांचे एकत्रिकरण करण्यासाठी सदर अभ्यासगट मार्गदर्शन करेल.
(३) होय.
(४) व (५) अभ्यासगटाच्या स्थापनेबाबत दिनांक ११/०८/२०२१ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या सदर शासन निर्णयानुसार अभ्यासगटाची कार्यवाही सुरु असून सदर अभ्यासगटाची पहिली बैठक दिनांक १२/११/२०२१ रोजी आयोजित करण्यात आली होती.

---

## राज्यातील वन खात्यात विभागीय वनाधिकारी, सहाय्यक वनसंरक्षक, वनपरिक्षेत्र अधिकारी यांची पदे कमी करण्यात आल्याबाबत

**(२०) ११५८२ (२०-११-२०२१) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वन खात्यात अवैध्य वृक्षतोड, शिकार, यासारखे संरक्षणाचा भार असताना मागील दहा वर्षापूर्वीच्या सुधारीत आकृतीबंधानुसार २० ते ३० टक्क्यांनी पदे वाढविणे अपेक्षित असताना अनेक महिन्यांपासून विभागीय वनाधिकारी, सहाय्यक वनसंरक्षक, वनपरिक्षेत्र अधिकारी अशी पदे कमी केल्याचे दिनांक २४/९/२०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एका अधिकाऱ्याकडे ४-५ क्षेत्राचा कार्यभार दिला जात असल्याने संरक्षणाबाबत प्रश्न निर्माण होत असल्याने सदर पदे नविन आकृतीबंधानुसार शासन निर्माण करणार आहे काय,

(३) असल्यास, सदर पदे कमी करण्याची कारणे काय आहेत, तसेच सदर पदे नविन आकृतीबंधानुसार निर्माण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (०८-१२-२०२१) :** (१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ अन्वये वन विभागाचा गट-"अ" ते गट-"ड" पदांचा सुधारीत आकृतीबंध ठरविण्यात आला आहे. सदर शासन निर्णयान्वये विभागीय वन अधिकारी १३, सहायक वनसंरक्षक २७ व वनपरिक्षेत्र अधिकारी संवर्गाचे १ अकार्यकारी पद निरसित करण्यात आलेले आहे.

(२) हे खरे नाही, अधिकारी उपलब्ध नसल्यास, रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार इतर अधिकाऱ्याकडे देण्यात येतो. सुधारीत आकृतीबंधानुसार पद निर्मिती करण्यात आली आहे.

(३) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक पदनि ०६१७/प्र.क्र.२००/आपुक, दिनांक २९/०६/२०१७ अन्वये एकूण मानव संसाधणाची मागणी ३०% कमी करणेबाबत निर्देशित करण्यात आलेले आहे. तसेच वित्तीय स्थैर्यासाठी शासन धोरणानुसार वेतनावरील खर्च नियंत्रित करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर संवर्गातील अतिरिक्त ठरणारी विभागीय वन अधिकारी, सहायक वनसंरक्षक व वनपरिक्षेत्र अधिकारी यांची अकार्यकारी पदे निरसित करण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **श्री.राजेन्द्र भागवत**

**मुंबई.** **प्रधान सचिव,**

**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.